# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**परिपत्रक क्र. १९१/२०१६**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील क्र. संकिर्ण २०१४/प्र.क्र.(२६५/१५) सहा, दिनांक ०१/१२/२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कारागृहातील न्यायाधिन बंदी (Under Trial Prisioners ) वा शिक्षाधिन (convicted) बंदयास सरसकट दारिद्र्य रेषेखालील अर्जदार न समजण्याबाबत तसेच प्रकरणपरत्वे बंदयाचे उत्पन्न व दारिद्र्य रेषेसंदर्भातील विहीत पुरावा लक्षात घेऊन त्यास दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती समजावे किंवा कसे या बाबत संबधीत जन माहिती अधिकारी यांनी स्वविवेक निर्णय घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर शासन परिपत्रकाची माहिती सर्वसंबंधितांच्या निदर्शनास आणण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पृष्ठांकन क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२२-२०१६/आस्था-२, दिनांक ३०/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदरचे परिपत्रक माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव यासोबत जोडण्यात आले आहे.

**(डॉ. नरेंद्र मा. कडू)**
**कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.**
**जा.क्र. - मा.अ./२०१६/२७८४**
**दिनांक - २७/१०/२०१६.**

**सोबत :-** वरीलप्रमाणे शासन परिपत्रक.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१) सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
२) सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
३) सर्व प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

(सोबत "कारागृहातील न्यायाधीन(Under Trail) या शिक्षाधीन(Convicted) बंदयांना, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये त्यांनी माहिती मागविताना, दारिद्रयरेषेखालील अर्जदार न समजण्याबाबत" या विषयाबाबतचे सामान्य प्रशासन विभागाचे, क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.२६५/१५/सहा, दि. १.१२.२०१५ रोजीचे शासन परिपत्रक)

पृष्ठांकन क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२२-२०१६/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, ४३१ ( विस्तार ), ४ था मजला,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,मुंबई-३२
E-mail-htedest२@gmail.com
दूरध्वनी क्रमाक - २२८५५७६६
दिनांक : ३० जानेवारी, २०१६.

प्रति,

मा.प्रधान सचिव ( उच्च व तंत्रशिक्षण ) यांचे स्वीय सहायक,
विभागातील सर्व उप सचिव (महाविद्यालयीन शिक्षण/विद्यापीठ शिक्षण/तंत्र शिक्षण/कला/ग्रंथालये),
कुलगुरु,सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
संचालक (उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण/कला/ग्रंथालय ),

(सोबतचे पत्र, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या/अधिका-यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात, ही विनंती )

**( शीतल रा.कदम )**
**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन**

(सोबत "कारागृहातील न्यायाधीन(Under Trail) या शिक्षाधीन(Convicted) बंदयांना, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये त्यांनी माहिती मागविताना, दारिद्रयरेषेखालील अर्जदार न समजण्याबाबत" या विषयाबाबतचे सामान्य प्रशासन विभागाचे, क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.२६५/१५/सहा, दि. १.१२.२०१५ रोजीचे शासन परिपत्रक)

पृष्ठांकन क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२२-२०१६/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, ४३१ ( विस्तार ), ४ था मजला,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,मुंबई-३२
E-mail-htedest२@gmail.com
दूरध्वनी क्रमाक - २२८५५७६६
दिनांक : ३० जानेवारी, २०१५

प्रति,

मा.प्रधान सचिव ( उच्च व तंत्रशिक्षण ) यांचे स्वीय सहायक,
विभागातील सर्व उप सचिव (महाविद्यालयीन शिक्षण/विद्यापीठ शिक्षण/तंत्र शिक्षण/कला/ग्रंथालये),
कुलगुरु,सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
संचालक (उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण/कला/ग्रंथालय ),

(सोबतचे पत्र, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या/अधिका-यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात, ही विनंती )

**( शीतल रा.कदम )**
**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन**

कारागृहातील न्यायाधीन (Under Trial) वा शिक्षाधीन (Convicted) बंदयांना, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्यानी माहिती मागविताना, दारिद्ररेषेखालील अर्जदार न समजण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१४ /प्र.क्र.(२६५/१५) सहा.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- ०१.१२.२०१५.

परिपत्रक:-

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ अन्वये सर्व नागरीकांना माहितीचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. तर अधिनियमाच्या कलम ७ (५) मध्ये, समुचित शासनाकडून निर्धारित करण्यात आलेल्या दारिद्ररेषेखालील अर्जदारांना, विनाशुल्क माहिती देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तथापि, कारागृहातील न्यायाधीन बंदी (Under Trial) वा शिक्षाधीन (Convicted) बंदयास दारिद्र रेषेखालील अर्जदार समजावे किंवा कसे याबाबत अधिनियमामध्ये स्पष्टता नाही. तत्संदर्भाने विधी व न्याय विभाग तसेच गृह विभागाचे अभिप्राय घेतले असता, न्यायाधीन बंदी (Under Trial) वा शिक्षाधीन (Convicted) बंदयास दारिद्र रेषेखालील अर्जदार समजावे किंवा कसे याबाबत मार्गदर्शक सूचना निर्धारित करण्यात याव्यात आणि कारागृहातील बंदीवान अर्जदारांची प्रकरणे स्वतंत्रपणे तपासून न्यायाधीन बंदी (Under Trial) वा शिक्षाधीन (Convicted) बंदयास दारिद्र रेषेखालील अर्जदार केव्हा समजावे, याबाबत प्रकरणपरत्वे निर्णय घेण्याचे अभिप्राय विधि व न्याय विभागाने दिले आहेत.

शासनाच्या पत्र क्रमांक केमाअ-२००६/प्र.क्र.७/०६/पाच दि. २०/६/२००६ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार कोणाला दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती समजावे याबाबत निकष विहीत केलेले आहेत. त्यानुसार नागरी क्षेत्रामध्ये वास्तव्य करणाऱ्या ज्या .व्यक्तीचे दरमहा दरडोई उत्पन्न रू. ५९१.७५ पेक्षा कमी आहे, तर ग्रामीण भागात ग्रामपंचायतीकडून करण्यात आलेल्या कुटूंबांच्या सर्वेक्षणानुसारच्या, दारिद्र्यरेषेखालील यादीतील व्यक्ती आणि ज्या कुटूंबाकडे पिवळ्या रंगाची शिधापत्रीका आहे, असे कुटूंब या सर्वाना दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती समजण्यात येते.

कारागृहात दाखल होण्यापूर्वी बंदयाचे उत्पन्नाचे विविध स्त्रोत असू शकतात, त्याव्यतिरिक्त कारागृहात दाखल झाल्यानंतर, कारागृहातील नियमानुसार त्यास मिळणारे आर्थिक उत्पन्नही असू

शकते, यास्तव कारागृह बंदयांना सरसकट दारिद्र रेषेखालील व्यक्ती समजून त्यांना विनाशुल्क माहिती देणे उचित होणार नसल्याचे गृह विभागाने अभिप्राय दिले आहेत.

आता विधि व न्याय विभाग तसेच गृह विभागाचे अभिप्राय लक्षात घेता, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीसाठी कारागृहातील न्यायाधीन बंदी (Under Trial) वा शिक्षाधीन (Convicted) बंदयास माहिती अधिकारात माहिती मिळविण्यासाठी दारिद्र रेषेखालील अर्जदार समजावे किंवा कसे याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे निणर्य घेत आहे-

कारागृहातील न्यायाधीन बंदी (Under Trial) वा शिक्षाधीन (Convicted) बंदयास सरसकट दारिद्ररेषेखालील अर्जदार समजण्यात येऊ नये. कारागृहात दाखल होण्यापूर्वी जे बंदी दारिद्ररेषेखालील कुटुंबात मोडत होते त्यांचा यासाठी अपवाद असेल. मात्र, दारिद्ररेषेखालील कुटुंबात मोडणाऱ्या बंदयांना (Convicted) शिक्षा झाली असल्यास व ती व्यक्ती १ वर्षाहून अधिक कालावधीसाठी शिक्षाधीन बंदी असल्यास, त्यांना कारागृहातून विहीत मर्यादेपेक्षा जास्त उत्पन्न मिळू शकते, त्यांनाही दारिद्ररेषेखालील अर्जदार समजण्यात येऊ नये. प्रकरणपरत्वे बंद्याचे उत्पन्न व दारिद्र्यरेषेसंदर्भातील विहीत पुरावा लक्षात घेऊन त्यास दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती समजावे किंवा कसे, याबाबत संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी स्वविवेके निर्णय घ्यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०१५१२०११२०४२९५८०७ असा आहे. हे परिपत्रक डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( राजेंद्र मा. जाधव )
शासनाचे उपसचिव

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३) सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४) राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७) *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११) मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१३) सर्व मंत्रालयीन विभाग (प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह)
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) महासंचालक, यशदा, पुणे
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

<u>*पत्राने</u>